कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक - ०४.१०.२०१०.

प्रति,

------------------------------,
------------------------------,
------------------------------.

**विषय** :- <u>ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २०१०. (फेरीवाला क्षेत्र ठरविणेबाबत)</u>

महोदय,

नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य कडील शासन निर्णय क्र.राफेधो/०३०९/ प्र.क्र.२०/ नवि-३४, दि.२.३.२००९ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समितीच्या क्षेत्रात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्यासाठी महापालिका प्रभाग फेरीवाला समितीची स्थापना करण्यांत आलेली आहे. शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यांत आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | - | मा.अध्यक्ष, कळवा प्रभाग समिती. |
| २) | सदस्य | - | संबंधित प्रभाग समितीमधील सर्व सन्मा.नगरसेवक |
| ३) | सदस्य | - | कार्यकारी अभियंता,सा.बा. विभाग |
| ४) | सदस्य | - | पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, कळवा विभाग. |
| ५) | सदस्य | - | वरिष्ठ पोलिस निरीक्षक, कळवा पोलिस स्टेशन, कळवा. |
| ६) | सदस्य | - | कार्य.अभियंता, शहर विकास विभाग, कळवा प्रभाग समिती. |
| ७) | सदस्य | - | वैद्यकीय अधिकारी,कळवा प्रभाग समिती. |
| ८) | सदस्य | - | प्रभाग अधिकारी (अति.नियं.व निष्का.विभाग)कळवा प्रभाग समिती. |
| ९) | सदस्य | - | सक्षम प्राधिकारी यांचेकडून स्थानिक पातळीवरील नोंदणीकृत फेरीवाला संघटनेचे ४ प्रतिनिधी (पैकी २ महिला) |
| १०) | सदस्य सचिव | - | सहाय्यक आयुक्त, कळवा प्रभाग समिती. |

तरी, कळवा प्रभाग क्षेत्रामध्ये राष्ट्रीय फेरीवाला क्षेत्र ठरविण्याबाबत चर्चा करण्यासाठी दि.६.१०.२०१० रोजी दुपारी ११.०० वाजता प्रभाग समिती कार्यालयात उपस्थित रहावे ही विनंती.

**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सहा.आयुक्त यांचे कार्यालय.
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
जा.क्र.-ठामपा/कप्रस/सहाआ
दिनांक - ४.१०.२०१०

## इतिवृत्तांत

**विषय** :- ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २०१०. (फेरीवाला क्षेत्र ठरविणेबाबत)

नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य कडील शासन निर्णय क्र.राफेधो/०३०९/प्र.क्र.२०/नवि-३४,दि.२.३.२००९ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समितीच्या क्षेत्रात फेरीवाला धोरण लागू करणेबाबत देण्यांत आलेल्या निर्देशानुसार आज दि.०४.१०.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता कळवा प्रभाग समितीच्या यशवंत रामा साळवी सभागृहात राष्ट्रीय फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र ठरविण्याबाबत सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | मा. अध्यक्ष |
| २. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| ३. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ५. | श्री. मिलिंद भारत पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ६. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ७. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ८. | ॲड.सौ.अनिता सुनील गौरी | - | सन्मा. सदस्या |
| ९. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| १०. | सौ. मनिषा महेश साळवी | - | सन्मा. सदस्या |
| ११. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| १२. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |
| १३. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |
| १४. | सौ. प्रज्ञा श. पोतदार | - | सदस्य सचिव |
| १५. | श्री. नितीन म.पवार | - | कार्य.अभि.सा.बा.विभाग, कळवा प्रभाग समिती. |
| १६. | श्री. मंगेश सावंत. | - | पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग. |
| १७. | श्री. पी.डी. पाटील | - | पोलिस निरीक्षक, कळवा |
| १८. | श्री. बी.बी.आंभोरे | - | वैद्यकीय अधिकारी, कळवा प्रभाग |

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील राष्ट्रीय फेरीवाला धोरण हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महापालिकेच्या ९ प्रभागांमध्ये राबवायचे आहे.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

राष्ट्रीय फेरीवाला धोरण काय आहे ?

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय,''ठाणे महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे आदर्श उपविधी २०१०''असे त्याचे नांव आहे. सदर उपविधी ठाणे महापालिका क्षेत्रात लागू राहील. तसेच फेरीवाला या शब्दाची व्याख्या म्हणजे आपला माल कोणत्याही पक्क्या संसाधनाशिवाय परंतु सार्वजनिक/खाजगी जमिनीवर एखादया तात्पुरत्या स्थिर संरचनेच्या आधारे किंवा फिरत्या गाडीच्या आधारे किंवा अन्य साधनाच्या सहाय्याने किंवा डोक्यावर भार वाहून फेरीने लोकांना वस्तुची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती. सदर फेरीवाल्याचे किमान १५ वर्षापासून सलग वास्तव्य ठाणे महानगरपालिका हद्दीत असणे आवश्यक आहे. नुसतेच वास्तव्य नाही तर व्यवसाय करीत असल्याचा पुरावाही हवा आहे.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, त्याठिकाणी फेरीवाल्याचे १५ वर्षे वास्तव्य पाहिजे की, व्यवसायही १५ वर्षेपासून पाहिजे.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, १५ वर्षापासून व्यवसाय करणाराही पाहिजे म्हणजे स्थिर फेरीवाला.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, आता जे फॉर्म काढले आहेत त्यामध्ये १५ वर्षे वास्तव्याचा दाखला मागितला आहे म्हणून आम्ही दिला आहे परंतू तो फेरीवाला व्यवसाय किती दिवस करतोय ते माहित नाही.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, फेरीवालांच्या व्याख्येमध्ये महानगरपालिका यांनी यापूर्वी दिलेले अपंगांकरिता पी.सी.ओ.बुथ, चर्मउद्योग, आरे-सरिता दूध केन्द्र तसेच इतर पक्के स्टॉल याचा समावेश आहे. यामध्ये स्थिर फेरीवाला म्हणजे जो नेमून दिलेल्या सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील एका जागेवर बसून मालाची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती आणि फिरता म्हणजे ढकल गाडीवरुन किंवा हातगाडीवरुन किंवा सायकलवरुन किंवा वाहनातून किंवा अन्य साधनावरुन किंवा डोक्यावरुन टोपलीतून मालावी विक्री करत एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जाणारी व्यक्ती.

फेरीवाला क्षेत्र १मध्ये महापालिकेकडून फिरता व स्थिर फेरीवाला यांना व्यवसायासाठी दिर्घकाळ किंवा तात्पुरते अनुज्ञेय म्हणून घोषित करण्यांत आलेले क्षेत्र.

फेरीवाला क्षेत्र २ मध्ये महापालिकेने घोषित केलेले असे क्षेत्र की, ज्या क्षेत्रामध्ये फक्त फिरता फेरीवाले व्यवसाय करु शकतील.

ना फेरीवाला क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की महापालिकेने त्यांच्या हद्दीमध्ये फेरीवाला व्यवसाय करणेकरिता प्रतिबंधित म्हणून जाहिर केलेले क्षेत्र. याकरिता खालीलप्रमाणे निकष आहेत --
२मीटरपेक्षा कमी रुंदीचे पदपथ, रस्ता, पदपथाचा शेवटचा भाग किंवा गर्दीच्या ठिकाणी, वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे, कोणताही वाहन वाहतुकीचा पुल, गोपनीयता व सुरक्षितता याकारणासाठी निश्चित केलेले क्षेत्र, दुकानासमोरील पदपथ, महापालिकेच्या बाजारापासून १०० मीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र, धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, रेल्वे स्थानक यांचे हद्दीपासून सर्व बाजूने १०० मीटर अंतरापर्यंतचे रस्ते व पदपथ परंतु धार्मिक स्थळाच्या शेजारी हार-तुरे,

नारळ, अगरबत्ती,मेणबत्ती, पुजा साहित्य विक्री करणा-यां स्थिर फेरीवाल्यांना जागा आरक्षित करता येईल. चौक व चौकापासून ५० मिटर क्षेत्र ना फेरीवाला म्हणून असेल. तरी सन्मा.सदस्यांनी आपापल्या प्रभागातील ना फेरीवाला क्षेत्र व फेरीवाला क्षेत्र सूचवावे.

तरीही आम्ही या निकषानुसार कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील ना फेरीवाला क्षेत्र सुचविले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

१) छत्रपती शिवाजी महाराज चौक व परिसर - कळवा नविन पुलावरुन उतरल्यानंतर डावी बाजू,पारसिक बॅक सभोवतालचा परिसर, शिवसेना शाखा-पोलीस चौकी परिसर
२) शिवराम पाटील (क्लॉक टॉवर) चौक
३) प्रकृति हॉस्पीटल मनिषानगर समोरील चौक
४) खारेगांव नाका चौक
५) हिरादेंवी माता चौक, खारेगांव
६) विटावा गांव प्रवेशद्वार परिसर
७) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय प्रवेशद्वार परिसर
८) होली माता चौक, खारेगांव (पेरीछाया इमारतीसमोरील चौक)
९) कळवा नाका पोलीस चौकी-कळवा मेडीकल-क्लॉक टॉवर-राणा टॉवर ते कळवा स्टेशन रस्ता व पदपथ
१०) कळवा जुने ग्रामपंचायत कार्यालय ते बाली टॉवर - कळवा मार्केट रस्ता व पदपथ
११) खारेगांव नाका ते हिरादेवी चौक रस्ता व पदपथ
१२) प्रकृति हॉस्पीटल ते सहयाद्री शाळेसमोरील मुख्य रस्ता व पदपथ
१३) क्लॉक टॉवर ते टी.एम.टी. डेपो मुख्य रस्ता व पदपथ
१४) खारेगांव शिवसेना शाखा ते रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता
१५) विटावा गांव ते सूर्यनगर रस्ता
१६) कळवा स्टेशन पूर्व ते फास्ट ट्रॅक न्यू शिवाजीनगर रस्ता व पदपथ
१७) वाघोबानगर, मोठा दुर्गा मंदिर ते श्रीमती.निर्मलादेवी दिघे प्रवेशद्वार रस्ता.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा आगाराच्या इथे परिवहनच्या गाडया लावलेल्या असतात तेथे कचरा साचून रहातो. तसेच तेथे रिक्षवाल्यांचेही नविन स्टॅण्ड झाले आहे. त्यावर काय उपाययोजना करणार ? मी आता येतानाही पाहिल

**श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा नाक्यावरील पारसिक बॅकेच्या येथील रिक्षावाल्यानांही हटवा.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम,शिवाजी चौकापासून ते आत्माराम चौकापर्यंत या रोडला एस.एम.जोशी मार्ग असे नांव दिलेले आहे व ठरावही झालेला आहे.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

सर्वात महत्वाचे म्हणजे ना फेरीवाला क्षेत्र घोषित करुन रस्ते मोकळे करणे गरजेचे आहेच. साधारणपणे ज्यावेळी एखादे शहर वसतं तेव्हा लोकसंख्येनुसार बाजारपेठ असणे आवश्यक असते.हे आपण करु शकलो आहे का ? कळवा मार्केटचा पत्ताच नाही. अशावेळी लोक जाणार कुठे ? याचा विचार झाला पाहिजे. लांबचा माणूस इथे येऊन कसा भाजी घेईल ! दुसरी गोष्ट म्हणजे फेरीवाल्यांबरोबरच रस्त्याच्या कडेला पार्किंगला ज्या गाडया लावलेल्या असतात त्यांचाही विचार झाला पाहिजे. कळवा स्कूलच्या रोडला किती पार्किंग आहे !

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, रस्त्यावर गॅरेज, फर्नीचरची दुकाने आहेत ती काढणे आवश्यक आहे. दत्तवाडीमध्ये गॅरेज खूप आहेत. तसेच मार्केटची सुविधा करा आणि मगच फेरिवाल्यांना हटवा. दुसरे म्हणजे खारेगांवांत आत मच्छीमार्केटमध्ये रस्त्यावर फेरिवाले बसलेले असतात. तेथून स्कुटरही जाऊ शकत नाही, ते हटविणे गरजेचे आहे. परंतू मार्केटची सुविधा झाल्याशिवाय हे करु शकत नाही कारण लोक भाजी घ्यायला जाणार कुठे ? लोक आम्हांला शिव्या देंतील. तेव्हा एकसाईड फेरीवाले हटवा. जिवनावश्यक वस्तू नसतील ते फेरिवाला हटवा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम ,या फेरिवाल्यांना एखादी वेळ व वार ठरवून दया.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय,खारेगांव नाका ते हिरादेवी मंदिर पर्यंत फेरीवाले हटविण्याबाबत चर्चा केली. हा रोड ६० फुटाचा आहे. या रोडला दोन्ही बाजूने फेरिवाले बसतात त्यांची पर्यायी व्यवस्था करावी. स्थानिक ज्या महिला आहेत त्या रोजचा दीडशे-दोनशे रुपयाचा व्यवसाय करतात परंतू जेव्हा महानगरपालिका किंवा पोलीस खाते त्यांना पकडून अकराशे रुपये दंड आकारतात. त्यांना कायमस्वरुपी जागा दिलेली नाही. तरी रस्त्याच्या डाव्या बाजूला सध्या त्यांना बसू देत. नंतर पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर पुढचा विचार करा. तसेच खारेगांव नाका ते आतकोनेश्वर नगर येथे गाडया लागलेल्या असतात. तेथे चो-याही होतात.

मागच्या महिन्यात खारेगांवात ३/४ वेळा कारवाई करण्यांत आली तेव्हा ३० ते ३५ गाडया तोडल्या. तेथील पवार कुटुंबियांची स्वतःची जागा होती व काहीतरी व्यवसाय करावा म्हणून गाळे काढलेले आहेत. त्यांना पर्यायी जागा दया.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, बाहेरचे फेरिवाल्यांच्या गाडया आहेत त्यां जरी काढल्या तरी गर्दी कमी होईल.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, तुम्ही फॉर्म फेरिवाल्यांसाठी दिले आहेत ते घेतलेले बहुतेक डोंबिवली, कल्याण, भिवंडी, ठाणे इथे रहाणारे आहेत त्यांचा काय संबंध ? हे योग्य नाही. स्थानिक लोकांना जागा मिळाली पाहिजे.

**मा.अध्यक्ष :-**

स्थानिकांना प्राधान्य दिले गेले पाहिजे.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, यासाठीच येथील १५ वर्षे वास्तव्याचा पुरावा मागितलेला आहे.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय,एखादा ओळखीचा माणूस येतो आणि या माणसाला दाखला दया असे सांगतो.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात फेंरिवाल्यांच्या व्यवसायासंदर्भामध्ये आपण आज प्रभाग समितीची सभा लावलेली आहे. आता मा.सहा.आयुक्तांनी जे वाचून दाखविले त्यामध्ये फेरिवाल्यांचे कार्यक्षेत्र कुठपर्यंत असावे, मार्केटपासून १०० मी.अंतरावर असावे वगैरे. कळव्यामध्ये मार्केटच्या भिंतीला लागून फेरीवाले,व्यवसाय करणारे बसलेले आहेत. तसेच चौका-पासून ५० मी.अंतरावर म्हटले आहे. कळवा, खारेगांव, विटावा या ठिकाणी दिवसेंदिवस वस्ती वाढत आहे. शहरीकरण होत आहे परंतू येथे मार्केटची सोय नाही. कळवा मार्केट किंवा खारेगांव मार्केट हे अत्यंत कमी आहे, लोकांसाठी अपूरे आहे त्यामुळे पाटया घेऊन भाजीवाले बसतात. ठाण्यातही तसेच आहे. पूर्वापार व्यवसाय करणारे स्थानिक फेरिवाले आहेत. त्यांना तेथून बाहेर काढले तर ते शिव्याशाप स्थानिक नगरसेवकाला देणार. प्रशासनाने या विषयाबाबत आधि माहिती दिली असती तर आम्ही सूचवू शकलो असतो. मुळात फेरीवाला स्थीर असो की अस्थिर त्यासाठी शासनाने किंवा महापालिकेने जागा दयावी तेथे त्यांना बसवा.

यासाठी नगरसेवकांकडून वास्तव्याचा दाखला घेत आहेत परंतू आम्हांला हे माहित नाही की तो किती वर्ष इथे व्यवसाय करतोय ! काल-परवाच्या पावत्या चिकटवतात त्यामुळे मूळ स्थानिक भूमिपत्र आहेत, जे वर्षानुवर्षे हा व्यवसाय करीत आहेत त्यांना प्राधान्य मिळाले पाहिजे ही आमची प्रमुख मागणी आहे. यासाठी जे काही नियम आहेत त्याबाबतची एक प्रत आम्हां सर्व नगरसेवकांना दया. आम्हांला याबाबत माहिती नाही. अधिकृत फेरीवाल्यांना जागा देताना अनधिकृतपणे बसणा-यांना काढण्याचे काम मॅडम,तुमचे आहे. तुमच्याकडे आलेली आकडेवारी दया, ते जासत बरे होईल.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, आपण अधिकृत जागा ठरविण्यासाठीच सभा लावली आहे.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, महापालिकेकडे आलेले कागदपत्र पाहून ठरवा व आम्हांला माहिती दया. तसेच पर्यायी जागा दयावी मगच या फेरिवाल्यांना हटवावे.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, यासाठी शहर विकास विभागाचे अधिकारी सभेमध्ये हवे होते. महापालिकेचे किंवा शासनाचे कुठे प्लॉट आहेत किंवा नाहीत हे त्यांनी सांगितले असते.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रशासनातर्फे आलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आपण सर्व येथे उपस्थित आहोत. आज पोलीस निरीक्षक तसेच वाहतूक शाखेचे अधिकारी उपस्थित आहेत. तसेच शहर विकास विभागाचे अधिकारीही उपस्थित असणे आवश्यक होते. आम्ही सांगणार हा रस्ता नको किंवा हा रस्ता घ्या तर तुम्ही ऐकणार का ? ना फेरिवाला क्षेत्रासाठी जे आपल्याकडून रस्ते सांगितले, त्यामध्ये असा एकही रस्ता किंवा जागा उरलेली नाही की तेथे फेरीवाले बसतील. मागच्या मा.महासभेमध्ये हा विषय आला तेव्हा कळव्यातील लोकांना २० रु.भाजी घेण्यासाठी ठाणा मार्केटमध्ये १००/- रु.खर्च करुन जावे लागते. तेव्हा मा.आयुक्तही म्हणाले की, शासन निर्णय आहे तरी त्याचा मान राखणे आपल्याला गरजेचे आहे. परंतू हा मान राखताना आमच्या नागरिकांना भाजी कमीत कमी दरात कशी उपलब्ध होईल हे पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी मार्केट विकसीत करण्याची गरज आहे. आपल्याकडे कुठे व किती प्लॉट आहेत याबाबत कोणतीही माहिती शहर विकास विभागाने दिलेली नसल्यामुळे काही सांगू शकत नाही कारण सर्व रस्त्यांना कुठेही शाळा, रुग्णालये, मंदिरे नाही असा प्रकार नाही. तेव्हा सर्वच रस्ते ना फेरीवाला क्षेत्र होईल. कुठेतरी पर्यायी जागा दिल्यानंतरच हे शक्य होऊ शकेल अन्यथा हे शक्य होणार नाही.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, आपण कोणकोणते रस्ते ना फेंरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावे ते सूचवावेत.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, काल कळवा पोलीस स्टेशनमधून फेरिवाल्यांवर कारवाई झाली तेव्हा १२-१५ फरिवाल्यांना पकडून नेले व दंड आकारुन सोडून दिले. परंतू या फेरिवाल्यांना दिवसभर फिरुन २००-३००रुपया मिळतात त्यातून ते दंड भरणार. हा झोन प्रतिबंधक आहे तर दुसरी जागा फेरीवाल्यांसाठी सुचविली पाहिजे. नगरसेवकांना रस्ते माहित आहेत परंतू कोणती जागा रिकामी आहे ते सांगू शकत नाही. तसा प्रस्ताव आपणाकडून दया.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, आता सुचविलेले सर्वच रस्त्यावरील फेरीवाले उठवायचे का ?

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, सर्वच रस्त्यावरील फेरीवाले उठवावे लागतील.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, किती फेरिवाले आहेत याची संख्या ठरली की जागा किती आवश्यक आहे हे समजेल.त्यांनंतर चर्चाही करता येईल.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा-खारेगांव-विटावा येथे कुठेही जागाच नाही. कोणाला कुठे व कोणत्या जागेमध्ये बसवायचे हा प्रश्न आहे. सर्वात प्रथम आम्हांला शासनाच्या निर्णयाची प्रत दया म्हणजे माहिती घेता येईल. सर्वात महत्वाचे म्हणजे वाहतुकीची कोंडी होते त्यासाठी कळवा पोलीस स्टेशन व वाहतूक विभाग यांनी एकत्रितपणे कार्यक्रम राबवा. शिवाली महाराज चौक ते सहयाद्री पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठया प्रमाणावर गाडया उभ्या असतात. तेथे दयामाया न दाखवता कारवाई करा. आपल्याकडे जॅमर किती आहेत ?

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, आपल्याकडे जॅमर नाहीत.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, काही रस्त्यांवर तर या गाडया पार्किग नकोच आहेत.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आत्माराम पाटील चौकापर्यंतच्या गाडया उचला.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, शिवाजी हॉस्पीटल पर्यतचा रस्ता घेतलेला आहेच परंतू शिवाजी हॉस्पीटलच्या आतील सर्व्हिस रोड आहे तेथे गाडया उभ्या असतात व तेथील लोकांना त्याचा त्रास होतो.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,कळवा नाका ते स्टेशन रोड हा रस्ता खूपच अडचणीचा झालेला आहे. प्रशासनाने सुचविलेले सर्व रस्ते मोकळे होणे गरजेचे आहे. पंरतू भूमिपुत्र किंवा स्थानिकांना पर्यायी जागा देणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, स्टेशन रोडला बाली टॉवरच्या पुढे किंवा सहयाद्रीकडे जाणारा रस्ता तेथे फारशी वाहतूक नसते. अश्या ठिकाणी करता येईल का किंवा अश्या काही जागा सूचवा.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सहयाद्रीच्या येथे जागा नाही.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आमच्या प्रभागामध्ये कोणता फेरिवाला किती वर्षे व्यवसाय करतो याची थोडीफार कल्पना आम्हांला आहे. नविन जे फॉर्म आहेत ते सर्व काढून टाका.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, १५ वर्षापासून व्यवसाय करणारे व त्यापेक्षा कमी वर्ष करणारे अश्या दोन यादया कराव्या लागतील.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिवः-**

मा. अध्यक्ष महोदय, ना फेरिवाला क्षेत्रासाठी सूचविलेले चौक व रस्ते सन्मा.सदस्यांना मान्य आहेत परंतू पर्यायी व्यवस्था झाली पाहिजे.

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, न्यू शिवाजीनगर मध्ये पूर्वीपासून गाडया लावलेल्या आहेत त्या राहू देत मात्र नविन फिरत्या गाडया आहेत त्या काढाव्यात.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिवः-**

मा. अध्यक्ष महोदय, समस्या व त्यावरील उपाय किंवा मार्ग आपल्याकडून आले तर जास्त सोपे होईल.

**मा.अध्यक्ष :-**

आम्ही हे सांगू शकत नाही कारण एकाला इथे बसवलं आणि दुस-याला दुसरीकडे तर पुन्हा रोष निर्माण होणार.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, प्रशासनाने निर्णय घ्यावा आमची परवानगी आहे फक्त पर्यायी जागा पाहिजे. एकाने ठेवले आणि दुस-याला पटले नाहीतर यामध्ये राजकारण सुरु होते.

**श्री. प्रभाकर पवार, सन्मा. स्विकृत सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदय, मागच्या कळवा प्रभाग समितीच्या सभेमध्ये मी नानीक अपार्टमेंटजवळ राज मोटार ट्रेनिंग स्कूल आहे तेथे गाडया लावलेल्या असतात. लोकांना जाण्या-येण्यास रस्ता नाही. तलावाच्या येथेंही बसेस उभ्या असतात. अजूनही त्या उचललेल्या नाहीत.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

सावंत साहेब, ८-१० गाडया राज मोटार ट्रेनिंग स्कूलच्या लागलेल्या असतात. मागे विषय झाला होता की आत्माराम चौक ते खारेगांव नाक्यापर्यंतचे सर्व गॅरेज काढून टाका. फुटपाथवर बसतात.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, गौरी पॅलेसपासून कळवा हायस्कूलचा रोड आहे या रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्त्यावरच बसेस, गाडया उभ्या आहेत. काही गाडया भंगारमध्ये टाकण्या सारख्या आहेत.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदय, तिथे गाडया उचलायला सुरुवत केली होती परंतू तिथे महानगरपालिकेने पे ॲण्ड पार्कचा बोर्ड लावला आहे त्यामुळे अडचण होते. तरी हा बोर्ड काढ ला तर कारवाई करता येईल व तिथे नो पार्किंगचा बोर्ड लावता येईल.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, आमच्या येथे ज्ञानप्रसारिणीची शाळा आहे तो मोठा हायवे रोड आहे. त्याच्याही दोन्ही रोडने गाडया पार्किंग केलेल्या आहेत.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा सूपर मार्केटचा रोड आहे तो ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत पूर्णपणें बंद करा. तेथे पूर्वी फेरिवाले बसत नव्हते.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कळवा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मनिषानगर पर्यंत दोन्ही बाजूला दोनचाकी, चार चाकी गाडया लागलेलया असतात त्याही सर्व उचला. पुढे अरुंद रस्ता असल्यामुळे वाहतुक कोंडी होते.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, क्लॉक टॉवरच्या येथे ८/९ फेरिवाले आहेत ते पहा. तसेच तेथील पेटी हलवून मागे घेतली तरी शंकर मंदिरपर्यंत रस्ता मोकळा होईल.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, राणा टॉवरच्या येथे गांधी नगरच्या रस्त्यावर अतिक्रमण होत आहेत. घडयाळयाच्या येथील टप-या मागे ढकलल्या तर रस्ता रिकामा होईल कारण ते लोक जुने आहेत.

**श्री. पी.डी. पाटील पोलिस निरीक्षक, कळवा :-**

मा. अध्यक्ष महोदय, यामध्ये माझे म्हणणें असे आहे, माझ स्वतःच्या निदर्शनास आलेल्या गोष्टीही आहेत की, ब-याचश्या ठिकाणी आजूबाजूला फेरिवाले नाहीत. कळवा चौकामध्ये मार्केट आहे परंतू ते बंद आहे. ते सुरु झाले तर चांगलेच आहे. मा.आयुक्त पहाणी करुन गेले आहेत परंतू पुन्हा तो प्रस्ताव तसाच राहिला आहे. जर मार्केट सुरु झाले तर आपोआपच हा परिसर मोकळा होईल.

दुसरे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते खारेगांव चौकापर्यंत फेरिवाल्यांचा त्रास इतका नाही. गॅरेज व पार्किंगच्या वाहनांमुळे जास्त त्रास आहे. तेव्हा धोकादायक वाहने रस्त्यावर ठेवली म्हणून गुन्हे दाखल करा. ८० फूटाचा रस्ता आहे. याबाबत सकपाळ साहेबांशीही बोललो आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सूकूर पार्क हा रस्ता पूर्ण नो पार्किग झोन केलेला आहे. मध्ये बोर्डही लावले होते. हे पार्किग निघेल मग काही प्रश्न नाही.

खारेगांव चौकीपासून ते हिरादेवी मंदिरापर्यंत मागच्या वेळेस येथील फेरिवाल्यांना रस्त्याच्या डाव्या बाजूला बसवलेले आहे. उजव्या बाजूला ५० एक फेरिवाले आहेत त्यांनाही डाव्या बाजूला बसवले तर तोही प्रश्न उरणार नाही. शिवसेना खारेगांव शाखा ते स्टेशन रोड इथेही कोणतीही एक साईड फेरिवाल्यांसाठी करा. हे जे फेरिवाले असतील ते स्थानिक असतील व संबंधित नगरसेवकाचा दाखला असेल असेच घ्या. शिवराम पाटील चौकामध्ये ७-८ फेरिवाले आहेत त्यांनाही हलवले पाहिजे. परंतू तेथे मोठा घाणीचा ढिगारा आहे तो काढला पाहिजे. खारेगांव प्रभाग समितीच्या कार्यालयाजवळच आहे आणि त्या रस्त्याला पूर्ण पार्किंगच्या गाडया आहेत व गाडया विक्रीची दुकानेही आहेत. या सर्व रस्त्यावंरील गाडया जरी उचलल्या तरी ७०% रस्ते मोकळे होणार आहेत.

महत्वाचा प्रश्न आहे तो कळवा मेंडिकल चौक ते कळवा स्टेशन रोड बाजारपेठ गल्ली. या लोकांना हलवायला पर्यायी जागा नाही. गांवदेवी मैदानाच्या अलिकडे मच्छीमार्केट दिलेले आहे. त्यामुळे तेथे मार्केट देता येणार नाही त्यामुळे येथील प्रश्न लवकर सुटणारा नाही.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, खारेगावंमध्ये मार्केटचा प्रस्ताव आहे त्याबाबत पहा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, सहकार बाजार ते स्टेशन रोडला जाणारा आतील रस्ता आहे या रस्त्यावर दुकानाच्या बाहेरही फेरिवाले बसलेले आहेत आणि हे दुकानदार त्यांच्याकडून भाडे घेतात म्हणून ते पदपथावर दुकानांसमोर बसतात. नाहीतर दुकानदार असे बसून देत नाहीत.

**श्री. पी.डी. पाटील पोलिस निरीक्षक, कळवा :-**

मा. अध्यक्ष महोदय, दुकानदारांनी पत्रे मारुन शेड बनविल्या आहेत त्याही काढल्या पाहिजेत. आपोआप दुकाने मागे जातात. १०००ते २०००/- रुपये भाडे दुकानदार महिन्याला फेरिवाल्यांकडून घेतात. तो रोड प्राधान्याने घेतला पाहिजे. विटावा विभागाचा तसा काही प्रश्न नाही.

**मा.अध्यक्ष :-**

प्रियांका हॉटेलच्या येथे गाडया उभ्या रहातात त्या उचला.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदय, मी दोन ठिकाणी पाहिले आहे तेथे वाहतूक कोंडी जास्त होते. प्रकृती हॉस्पीटलच्या इथे महापालिकेने पे ॲण्ड पार्कचे बोर्ड लावले आहे ते निघाले तर मला कारवाई करता येईल. तेथे वाहतुक कोंडी जास्त होते. तसेच रिक्षा स्टॅण्डच्या येथे नो पार्किंग झोन असेल तर तेथे तसा बोर्ड लावावा लागेल. तसे असेल तर तेथेही कारवाई करणे सोपे होईल.

**सौ.अनिता गौरी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रकृती हॉस्पीटलच्या येथे रुग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक यांच्या गाडया असतात.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, आतमध्ये पार्कींगसाठी जागा आहे. सूपरमार्केटच्या इथे दुचाकी गाडया खूप असतात. फक्त संध्याकाळी ५ ते ९ पर्यंत संध्याकाळच्या वेळेत तेथे गाडया नकोत. तरीही बरीच वाहतूक कोंडी कमी होईल.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, ढोणे हॉस्पीटलसमोर सावी पॅलेस, श्रीजी कंन्स्ट्रक्शन तेथेच तंदूरवालाही बसतो तेही उचला.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, चौकापासून पुढे सर्व पे ॲण्ड पार्कचे बोर्ड काढून घेतो.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, दुकानांसमोरील बसणारे फेरीवाले व रस्त्यावरील अतिक्रमण काढून घेणे व फेरिवाल्यांना काही रस्त्यांच्या एक बाजूस ठेवू शकतो असे आपणा सर्वाना मान्य आहे. तसेच ना फेरिवाला क्षेत्र सर्वांना मान्य आहे असे मी समजते.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मॅडम,एका-एकाच्या १०-१२ गाडया रस्त्यावर लागतात त्याबाबतही चौकशी करा.

**श्री. पी.डी. पाटील पोंलिस निरीक्षक, कळवा :-**

मा. अध्यक्ष महोदय, आमची आपणांस विनंती आहे की, या हातगाडया उचलताना कोणीही त्यात राजकारण आणू नका. मॅडम, प्राधान्याने शिवाजी महाराज चौक ते खारेगांव नाका हा रस्ता घ्या.

**श्री.राजेंद्र साप्ते -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, पुढील सभा केव्हा लावणार ?

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा. अध्यक्ष महोदय, आपण लगेचच पुढील सभा लावू. तसे सर्वांना कळविण्यांत येईल.

(वरील सर्व चर्चेनंतर मा.अध्यक्ष व मा.सहा.आयुक्त,यांनी सर्वांचे आभार मानून सदर सभा संपल्याचे जाहीर केले.)

सही/- सुभाष खारकर,<br>
अध्यक्ष,<br>
कळवा प्रभाग समिती,<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.अतिरीक्त आयुक्त, ठा.म.पा.<br>
२) मा.उपआयुक्त नियंत्रण व निष्कासन विभाग, ठा.म.पा.<br>
३) मा.उपआयुक्त (कळवा/मुंब्रा प्रभाग समिती).<br>
४) सर्व सदस्य, प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती.

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सहा.आयुक्त यांचे कार्यालय.
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
जा.क्र.-ठामपा/कप्रस/सहाआ
दिनांक - ६.१०.२०१०

## इतिवृत्तांत

**विषय** :- ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २०१०. (फेरीवाला क्षेत्र ठरविणेबाबत)

नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य कडील शासन निर्णय क्र.राफेधो/०३०९/ प्र.क्र.२०/नवि-३४,दि.२.३.२००९अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समितीच्या क्षेत्रात फेरीवाला धोरण लागू करणेबाबत देण्यांत आलेल्या निर्देशानुसार आज दि.०६.१०.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता कळवा प्रभाग समितीच्या यशवंत रामा साळवी सभागृहात राष्ट्रीय फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र ठरविण्याबाबत सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | मा. अध्यक्ष |
| २. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| ३. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ५. | श्री. मिलिंद भारत पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ६. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ७. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ८. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| ९. | सौ. मनिषा महेश साळवी | - | सन्मा. सदस्या |
| १०. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| ११. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |
| १२. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |
| १३. | सौ. प्रज्ञा श. पोतदार | - | सदस्य सचिव |
| १४. | श्री. नितीन म.पवार | - | कार्य.अभि.सा.बा.विभाग, कळवा प्रभाग समिती. |
| १५. | श्री. मंगेश सावंत. | - | पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग. |
| १६. | श्रीम. प्रभावती भालेराव | - | प्रभाग अधिकारी (अति. नियं.व निष्का.विभाग) कळवा प्रभाग समिती |
| १७. | श्री. बी.बी.आंभोरे | - | वैद्यकीय अधिकारी, कळवा प्रभाग |
| १८. | श्री. संजय कोळेकर | - | सर्वेअर, शहर विकास विभाग |
| १९. | श्री.चेतन पटेल | - | उप.अभि.सा.बा.विभाग, कळवा प्रभाग समिती |

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा.अध्यक्ष महोदय व सन्मा.सदस्य, आपण दि.४.१०.१० च्या सभेमध्ये ना फेरिवाला क्षेत्र ठरविले. आज आपणासमोर फेरिवाला क्षेत्र व ना फेरिवाला क्षेत्राची एक-एक प्रत दिलेली आहे. यामध्ये काही बदल करावयाचा असल्यास तश्या सूचना कराव्यात. मी आधि ना फेरिवाला क्षेत्राची यादी वाचते त्यामध्ये काही सूचना असल्यास सांगा.

**ना फेरिवाला क्षेत्र**

१) छत्रपती शिवाजी महाराज चौक व परिसर - कळवा नविन पुलावरुन उतरल्यानंतर डावी बाजू,पारसिक बॅक सभोवतालचा परिसर, शिवसेना शाखा-पोलीस चौकी परिसर
२) शिवराम पाटील (क्लॉक टॉवर) चौक
३) प्रकृति हॉस्पीटल मनिषानगर समोरील चौक
४) खारेगांव नाका चौक
५) हिरादेंवी माता चौक, खारेगांव
६) विटावा गांव प्रवेशद्वार परिसर
७) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय प्रवेशद्वार परिसर
८) होली माता चौक, खारेगांव (पेरीछाया इमारतीसमोरील चौक)
९) कळवा नाका पोलीस चौकी-कळवा मेडीकल-क्लॉक टॉवर-राणा टॉवर ते कळवा स्टेशन रस्ता व पदपथ
१०) कळवा जुने ग्रामपंचायत कार्यालय ते बाली टॉवर - कळवा मार्केट रस्ता व पदपथ

**श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, हा भाजी मार्केटचा रस्ता आहे तर तो ना फेरिवाला क्षेत्र कसा करणार ?

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

११) खारेगांव नाका ते हिरादेवी चौक रस्ता व पदपथ
१२) प्रकृति हॉस्पीटल ते सहयाद्री शाळेसमोरील मुख्य रस्ता व पदपथ
१३) क्लॉक टॉवर ते टी.एम.टी. डेपो मुख्य रस्ता व पदपथ
१४) खारेगांव शिवसेना शाखा ते रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता
१५) विटावा गांव ते सूर्यनगर रस्ता
१६) कळवा स्टेशन पूर्व ते फास्ट ट्रॅक न्यू शिवाजीनगर रस्ता व पदपथ
१७) वाघोबानगर, मोठा दुर्गा मंदिर ते श्रीमती.निर्मलादेवी दिघे प्रवेशद्वार रस्ता.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,कळवा मेडिकल स्टोअर्सपासून जुने ग्रामपंचायत ऑफिस या रस्त्याचा ना फेरिवाला क्षेत्रामध्ये समावेश करा. तेथे कोणी फेरिवाले बसत नाहीत फक्त हातगाडया घेऊन फिरतात.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

मा.अध्यक्ष महोदय, या रस्त्याचा समावेश करण्यांत येईल. हे वरील सर्व ना फेरिवाला क्षेत्र सर्वांना मान्य आहे असे मी समजते आणि आता फेरिवाला क्षेत्र कोणते आहे ते वाचून दाखवते.

**फेरिवाला क्षेत्र**

१) कळवा स्टेशन रस्ता - बाली टॉवर ते कल्व्हर्ट (एक बाजू)

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, हे जे कल्व्हर्ट आहे ते रेल्वेच्या हद्दीत आहे. तेथे फेरिवाल्यांना बसू देतील का ? रेल्वेवाले आताही तेथे कारवाई घेतात. तरी रेल्वेबरोबर आधि चर्चा करुन घ्या.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय,तो रस्ता आपल्याकडे आहे. कळवा स्टेशनवरुन एक रस्ता येतो तो सहयाद्रीकडे जातो व एक रस्ता तेथून पुढे जातो. वाय आकार तेथे आहे. बाली टॉवर पासून सहयाद्रीकडे रस्ता संपतो तिथपर्यंत घेतला आहे.

**श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय,आता ज्या ठिकाणापर्यंत फेरिवाले बसत आहेत त्या ठिकाणापर्यंतचं बसवा पुढे अजिबात बसवू नका. सहयाद्री सोसायटीच्या जवळ नको. कल्व्हटच्या येथे १०० एम.एल.डी.ची पाईपलाईन टाकली तेव्हा तिथे पोलीस आले आणि आपल्या इंजिनियरला नेले होते. नेहमी तिथे कचरा टाकला जातो तो रस्ता रेल्वेचा आहे. कल्व्हर्ट मोठे करायचे होते ते काम रेल्वेवाले करुन देत नव्हते.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, मागे गटाराच्या फुटपाथवर धबधबा बसवला तो त्यांनी तोडला. आपली मालकी आहे परंतू रेल्वेशी चर्चा करुन घ्या.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, मी रेल्वे विभागाशी चर्चा करुन घेतो. ते जर नाही म्हणाले तर दुसरा रस्ता सुचवा.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मॅडम,गांवदेवी मैदानाच्या इथे रोडच्या उजव्या बाजूला फेरिवाले बसू देत. गांवदेवी मार्केट रोड अद्यावत करण्यासाठी सन्मा.सदस्यांनी पत्र दिले आहे. तो अद्यावत झाला तर बरेचसे प्रश्न सुटतील. स्टेशन रोड ते कल्व्हर्टपर्यंत रेल्वेशी बोलून घ्या. दुसरे म्हणजे लक्ष्मी निवास बिल्डींग ते तन्नू बिल्डींग पर्यंत फुटपाथ सोडून आतल्या बाजूला एकसाईड २०/२५ फेरिवाले बसू शकतील. तेथे बरीच जागा आहे. तसेच सिध्दीविनायक ते जय विजय सोसायटीपर्यंत एक बाजू उजवीकडे दया. सहकार बाजारच्या येथे फेरिवाले बसवू नका. त्यानंतर जवाहर वाचनालय ते शारदा टॉवरपर्यंतही एक बाजू उजवीकडे दया.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,कळव्यातील बरेचसे आतले रस्ते आहेत तेथे फेरिवाले बसतच नाहीत ते सर्व रस्ते ना फेरिवाला क्षेत्रामध्ये घ्या.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

२) बाली टॉवर ते सुदामा/सहयाद्री सोसायटीकडे जाणारा रस्ता (एक बाजू)

**श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, बाली टॉवरच्या कोप-यापर्यंत ठिक आहे त्याच्या पुढे नको आणि दुकानाच्या बाजूने बसवू नका तर दुस-या बाजूला एकसाईड बसू देत. तेथील दुकानदार पैसे घेऊन फेरिवाल्यांना बसू देतात.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिवः-**

असे असेल तेथे दुकानदारांवरच कारवाई करणार आणि दुकाने जी फुटपाथवर आली आहेत त्यांच्यावरही कारवाई होणार आहे.

३) टि.एम.टी.डेपो ते बुधाजीनगर रस्ता (एक बाजू)

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, हा रस्ता घेऊ नका. तेथे परिवहनच्या बसेस उभ्या असतात तसेच मोठ-मोठया गाडया रस्त्यावरुन जात असतात. तेथे अशीही फार गर्दी असते तेव्हा हा रस्ता ना फेरीवाला क्षेत्र राहू देत. तसेच क्लॉक टॉवरच्या तेथे चौक बनवून त्या फेंरिवाल्यांना न काढता आतमध्ये सरकवा. तेथील लोकांना भाजी घेण्यासाठी तीच जागा व्यवस्थित आहे. फेरिवाले एक साईड बसू देत. पुढे पार्किंग होते ती कमी होईल.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, शाळेच्या बाजूला फेरिवाले बसू देत. तेथे जागा आहे. तेथे किती वैध अर्ज आले आहेत ?

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिवः-**

छाननी झालेली नाही. अजून अर्ज येत आहेत.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, बुधाजीनगरमध्ये खाजगी जागा आहे काय ?

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, नाही. क्लॉक टॉवरच्या येथील घाणीचे साम्राज्य कमी करा.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिवः-**

४) गणेश विसर्जन घाट रस्ता, कळवा (एक बाजू)

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, चौकामधून जे फेरिवाले उचलू त्यांना या रस्त्यावर एक बाजू बसवू.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्याः-**

मा. अध्यक्ष महोदय, तेथे भाजी घ्यायला कोणीही जाणार नाही. ३ व ४ क्रमांकाचे दोन्हीही रस्ते फेरिवाला क्षेत्रामध्ये घेऊ नका.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, तेथे जबरदस्ती केली तरी कोणीही फेरिवाले बसणार नाहीत.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

५)　महात्मा फुलेनगर रस्ता - पाण्याची टाकी ते स्मशानभूमी कॉर्नर (एक बाजू)

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, कोणता रस्ता आहे ?

**श्री.चेतन पटेल -उप अभियंता .(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, पाईप लाईनकडील मागचा रस्ता. पाण्याची टाकीपासून स्मशानभूमी पर्यंतचा रस्ता.(एक बाजू)

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, त्या रस्त्याचे नांव सायबानगर आहे.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

६)　गणपतीपाडा रस्ता ते इंडाल कंपनी जवळ (एक बाजू)

**मा.अध्यक्ष :-**

कोणत्या बाजूला फेरिवाले बसतील ?

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

मा.अध्यक्ष महोदय, डाव्या बाजूला इंडाल कंपनीच्या कंपाऊंडला लागून मोकळी जागा आहे. त्यांनी अशीच कंपाऊंड टाकुन घेऊन ठेवली आहे त्या जागेमध्ये विटावा चौकातील सर्व फेरिवाले येथे बसतील.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

७)　चाहूदादा पाटील मार्ग - ओमकार सोसायटी ते उर्जा प्रतीक सोसायटी (एक बाजू)
८)　कै.काशिनाथ राघो पाटील मार्ग - खारेगांव नाका ते दिवेश पार्क (एक बाजू)
९)　बुधाजी पाटील मार्ग - साईलिला ते वैष्णवीधाम सोसायटी गेट (एक बाजू)
१०)　खारेगांव - शिवसेना शाखा ते रेल्वे फाटक (एक बाजू)

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय,ओकार सोसायटीच्या येथील डाव्या बाजूला फेरिवाला क्षेत्र करा. तसेच कै. काशिनाथ राघो पाटील मार्ग ते दिवेश पार्कपर्यंत उजवी बाजू ठेवू नका डाव्या बाजूलाच एकीकडे फेरिवाले बसवा. तसेच साईलिला ते वैष्णवीधाम सोसायटी गेट पर्यंत एक बाजू ठेवा. या रस्त्यावर कोणीही फेरिवाले बसत नाहीत. फक्त होली माता जवळ १०/१२ गाडया असतात त्यांना पुढे वैष्णवधामच्या येथे एस.एम.जोशी मार्ग उतरल्यानंतर डाव्या बाजूला जागा आहे तेथे बसवा. खारेगांव - शिवसेना शाखा इथेही डावीकडे एक बाजू घ्या. तेथे डोंगरातील १५० ते २०० रिक्षावाले आहेत त्यांना हटवा.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

११)　कळवा (पूर्व) न्यू शिवाजीनगर रस्ता - कळवा रेल्वे स्टेशन ते मुकुंद कंपनी (एक बाजू)

**सौ.मनिषा साळवी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, फुटपाथ मोकळा करुन समोरच्या बाजूला एक बाजू फेरीवाला क्षेत्र करा.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, तेथील गाडया पार्क केलेल्या आहेत ते काढून घ्या.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, महापालिकेच्या सर्व फुटपाथवरील अतिक्रमणे काढून घ्या.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

सन्मा.सदस्य श्री.सचिन म्हात्रे यांच्या प्रभागामध्ये फेरिवाला क्षेत्र कोणते ठरवायचे ते त्यांनी सांगावे.

**श्री.सचिन म्हात्रे-सन्मा.सदस्य :-**

मॅडम, माझ्या प्रभागामध्ये गायकर मैदान आहे तेथे फेरिवाले बसू शकतील. निर्मलादेवी दिघे रस्ता फारच छोटा आहे. त्याच्या दोन्ही बाजूने सध्या फेरिवाले बसतात.

**श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-**

सदरची जागा खाजगी वापरातील आहे काय ?

**श्री.सचिन म्हात्रे-सन्मा.सदस्य :-**

मॅडम, तेथे कोणी विरोध करणार नाही. दुसरी मोकळी जागा नाही.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

सावंत साहेब, आपल्या विभागामार्फत पार्किंग झोन व नो पार्किंग झोन करावे लागतील.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदय, कॉर्नर पार्किंग व बसस्टॉप जवळ ३० मीटर मागे पुढे नो पार्किंग झोन असेल अशी सूचना काढण्यांत येणार आहे.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

सावंत साहेब, सन्मा.सदस्य मिलींद पाटील व प्रमिला केणी यांच्या प्रभागामध्ये दोन्ही बाजूने पार्किंग असते. तेथील गाडया उचला.

**सौ.प्रमिला केणी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, कळवा मेडिकलच्या येथे अपघात वरचेवर होत असतात.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

तेथे नो पार्किंग झोन करता येईल.

**श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, शाळेच्या येथील रोड आहे तेथे श्रीनाथ बिल्डींग आहे तेथेही गाडया उभ्या असतात त्याही काढा.

**<u>श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-</u>**

तेथे आपण पी वन/पी टू करुन घेऊ.

**<u>श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-</u>**

सावंत साहेब,गांवदेवी मैदानाच्या बाजूला पार्किंग डाव्या बाजूला करा. तेथे मोठा रोड आहे. मार्केटमध्ये येणारे लोक कुठेही गाडया लावतात त्यामुळे वाहतूक कोंडी होते. हे लोक तेथे टू व्हिलर किंवा फोर व्हिलर लावू शकतात.

**<u>श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-</u>**

मा. अध्यक्ष महोदय, प्रकृती हॉस्पीटलच्या येथे पार्कींग झोनचा बोर्ड आहे तो महापालिकेने लावला आहे काय ? तेथे दुकानात जाताना लहान मुले पडतात. तेथे फुटपाथ मोठा आहे तेथे पार्किग घ्या.

**<u>श्री.नितीन पवार - कार्य. अभि.(सा.बा.) :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, मराठे साहेब असताना कुठे कुठे पार्किग करता येईल व कुठे नाही त्यानुसार हा बोर्ड बसवला होता. आता काढून घेतो.

**<u>श्री.मिलींद पाटील -सन्मा.सदस्य :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय,भाटीया गॅरेजच्या आंत खूप जागा आहे तेथे पार्किंग घ्या.

**<u>श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-</u>**

तेथील रुग्ण व त्यांना पहायला येणारे नातेवाईक यांच्या गाडया पार्क केलेल्या असतात. मी एकदा हे पार्किंग झोन ठरवून घेतो.

**<u>श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-</u>**

सावंत साहेब, २०-२५ फूटाचा फुटपाथ आहे तेथे दोन्ही बाजूने गाडया पार्कींग होतील.

**<u>श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, गणपती विसर्जनाच्या दिवशी दोन गाडया काढल्या. टोईंग लावली की मालक पळत येतात. तेव्हा दोन गाडया काढल्या आणि पुन्हा तेथु दुस-या दोन गाडया उभ्या आहेत. तेथे जॅमर लावला आहे तो तसाच आहे.

**<u>श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-</u>**

मा. अध्यक्ष महोदय, बाली टॉवरच्या येथे सुदामा व सहयाद्रीकडे येणारा रस्ता याबाबत मी पत्र दिले होते व त्याबाबत वाहतूक शाखेला पत्र दिलेले होते. याबाबत मराठे साहेबांनी वाहतूक शाखेलाही पत्र दिले होते. परंतू अजून तेथील गाडया तश्याच आहेत. याबाबत मी तुम्हांला वैयक्तिक विनंती करते की या गाडया उचला. नक्की कोणत्या गाडया लागतात ते मला माहित नाही,मालक कोण आहेत तेही माहित नाही. तिथे चो-या होतात व नका त्या गोष्टी घडतात.

**<u>श्री.सचिन म्हात्रे-सन्मा.सदस्य :-</u>**

मा.अध्यक्ष महोदय, सरोवर हॉटेल ते सहयोग अपार्टमेंटच्य आतील रस्त्यावर गाडया एक बाजू पार्किंग झोन करा. दोन्ही बाजूने गाडया उभ्या असतात.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदय, पी वन पी टू केले पाहिजे.  नोटिफिकेशन नसल्यामुळे कॉर्नर पार्किंगची कारवाई करतो.  पार्किगसाठी किती जागा घेऊ शकतो ते पाहू त्यानंतर ठरवू.

**श्री.सचिन म्हात्रे-सन्मा.सदस्य :-**

मा.अध्यक्ष महोदय, माझ्या येथे सर्व्हिस सेंटरवाले आहेत त्यांच्या येथे बाईक, स्कूटर लागलेल्याच असतात.

**श्री. मंगेश सावंत-पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा, कळवा विभाग :-**

मा.अध्यक्ष महोदय, गॅरेजवाल्यांवर ठाणे महानगरपालिका व आम्ही एकत्र कारवाई घ्यावी लागेल.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

आज व उद्या पोलीस बंदोबस्त जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामे हटविण्याची मोहिम आहे तिकडे आहे.  परंतू ही कारवाई लवकरात लवकर घेण्यात येईल.

**श्रीम.सुरेखा खातू -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदय, भंगारवाले चेकर्सचे लोखंड काढून विकतात.

**श्री.गणेश साळवी -सन्मा.सदस्य :-**

मॅडम,माझ्या प्रभागात पौंडपाडा येथील वर्षा दुकानासमोर मोठी जागा आहे तेथे पार्किंग झोन होऊ शकेल.  भास्करनगरमधील मंदिराजवळ नो पार्किंग झोन करा.

**मा.सहा.आयुक्त -सदस्य सचिव:-**

सन्मा.सदस्य गणेश साळवींच्या प्रभागातील कोणताही फेरीवाला पावती फाडत नाही आणि पावतीवाल्यांना धक्काबुकी करतात.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मॅडम, सन्मा.सदस्य गणेश साळवी व सन्मा.उपमहापौर -श्री.मनोज लासे यांच्या प्रभागातील फेरीवाला क्षेत्र किंवा ना फेरीवाला क्षेत्र घेतलेले नाहीत त्या क्षेत्राचाही समावेश करावा.

:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:

**चर्चेच्या अनुषंगाने घेण्यांत आलेले प्रकरण क्रमांक ११७ - विषय** :ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन)आदर्श उपविधी २०१०. (फेरीवाला क्षेत्र ठरविणेबाबत)

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - १२१,दिनांक -०६.१०.२०१०**

**ठराव**

शासनाचे फेरिवाला धोरणानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील फेरिवाला धोरण ठरविणेसाठी मा.महासभा ठराव क्र.५५,दि.१८.७.२००९ अन्वये प्रभाग फेरिवाला समिती व प्रभाग फेरिवाला तांत्रिक समिती नियुक्ती करण्यांत आली आहे.  प्रभाग फेरिवाला समिती मार्फत प्रभागाचे

फेरिवाला धोरण निश्चित करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार मा.कळवा प्रभाग समितीच्या दि.६.१०.२०१० च्या सभेमध्ये सदर बाबतीत सविस्तर चर्चा झाली असून खालीलप्रमाणे जागा फेरिवाला क्षेत्र झोन १, स्थिर फेरिवाला क्षेत्र झोन २ व ना फेरिवाला क्षेत्र निश्चित करण्यांत आले आहे.

तरी त्यावर नागरिकांच्या सुचना व हरकती मागणेची कार्यवाही करणेसाठी ही समिती मान्यता देत आहे व पुढील कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांत यावी असे ठरवित आहे.

## कळवा प्रभाग समिती
## प्रस्तावित फेरावाला क्षेत्र - II यादी

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | फेरिवाला झोन II चे ठिकाण | फेरिवाला क्षेत्राची लांबी (मी.) | फेरिवाल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कळवा स्टेशन रस्ता | बाली टॉवर ते कल्व्हर्ट | १०० मी. | ७४ |
| २ | सहयाद्री सोसायटीकडे जाणारा रस्ता | बाली टॉवर ते सुदामा | ५०मी. | ३७ |
| ३ | बुधाजीनगर रस्ता | टि.एम.टी.डेपो ते बुधाजीनगर | ८० मी. | ६० |
| ४ | गणेश विसर्जन घाट | कळवा | ७० मी. | ५० |
| ५ | महात्मा फुले नगर रस्ता | पाण्याची टाकी ते स्मशानभूमी कॉर्नर सायबानगर | ७० मी. | ५१ |
| ६ | गणपतीपाडा रस्ता | गणपतीपाडा रस्ता ते इंडाल कंपनी जवळ | २०० मी. | १४५ |
| ७ | चाहूदादा पाटील मार्ग | ओमकार सोसायटी ते उर्जा प्रतीक सोसायटी | २५० मी. | १८५ |
| ८ | कै. काशिनाथ राघो पाटील मार्ग | खारेगांव नाका ते दिवेश पार्क | १८० मी. | १३० |
| ९ | बुधाजी पाटील मार्ग | साईलिला ते वैष्णवीधाम सोसायटी गेट | १६० मी. | ११८ |
| १० | खारेगांव | शिवसेना शाखा ते रेल्वे फाटक | १०० मी. | ७४ |
| ११ | कळवा (पूर्व) न्यू शिवाजीनगर रस्ता | कळवा रेल्वे स्टेशन ते मुकुंद कंपनी | १५० मी. | ११० |
| १२ | पौंडपाडा | वर्मा दुकानासमोरची जागा | १०० मी. | ७४ |
| | | एकूण | १५१० मी. | ११०८ |

## <u>ना फेरावाला क्षेत्र प्रस्तावित यादी</u>

१) छत्रपती शिवाजी महाराज चौक व परिसर - कळवा नविन पुलावरुन उतरल्यानंतर डावी बाजू,पारसिक बॅक सभोवतालचा परिसर, शिवसेना शाखा-पोलीस चौकी परिसर
२) शिवराम पाटील चौक (क्लॉक टॉवर) पार्टे चक्की चौक
३) प्रकृति हॉस्पीटल मनिषानगर समोरील चौक
४) खारेगांव नाका चौक
५) हिरादेवी माता चौक, खारेगांव
६) विटावा गांव प्रवेशद्वार परिसर

७) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय प्रवेशद्वार परिसर
८) होली माता चौक, खारेगांव (पेरीछाया इमारतीसमोरील चौक)
९) कळवा नाका पोलीस चौकी-कळवा मेडीकल-क्लॉक टॉवर-राणा टॉवर ते कळवा स्टेशन रस्ता व पदपथ
१०) कळवा जुने ग्रामपंचायत कार्यालय ते बाली टॉवर - कळवा मार्केट रस्ता व पदपथ
११) खारेगांव नाका ते हिरादेवी चौक रस्ता व पदपथ
१२) प्रकृति हॉस्पीटल ते सहयाद्री शाळेसमोरील मुख्य रस्ता व पदपथ
१३) क्लॉक टॉवर ते टी.एम.टी. डेपो मुख्य रस्ता व पदपथ
१४) खारेगांव शिवसेना शाखा ते रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता
१५) विटावा गांव ते सूर्यनगर रस्ता
१६) कळवा स्टेशन पूर्व ते फास्ट ट्रॅक न्यू शिवाजीनगर रस्ता व पदपथ
१७) वाघोबानगर, मोठा दुर्गा मंदिर ते श्रीमती.निर्मलादेवी दिघे प्रवेशद्वार रस्ता.
१८) कळवा मेडिकल - जुने ठा.म.पा.कार्यालय

**सुचक -** श्री.उमेश का.पाटील **अनुमोदक -** श्री.अशोक ना.भोईर

**सर्वानुमते मंजूर**

सही/- सुभाष खारकर.
**अध्यक्ष,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

(वरील सर्व चर्चेनंतर मा.अध्यक्ष व मा.सहा.आयुक्त यांनी सर्वांचे आभार मानून सदर सभा संपल्याचे जाहीर केले.)

संपल्याची वेळ :- दुपारी १.१५ वाजता.
दिनांक :- ६ऑक्टोंबर, २०१०
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सही/- सुभाष खारकर,
**अध्यक्ष,कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सही/-प्रभावती भालेराव,
**प्रभाग अधिकारी, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**प्रत माहितीसाठी :-**
१) मा.अतिरीक्त आयुक्त, ठा.म.पा.
२) मा.उपआयुक्त नियंत्रण व निष्कासन विभाग, ठा.म.पा.
३) मा.उपआयुक्त (कळवा/मुंब्रा प्रभाग समिती).
४) सर्व सदस्य, प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती.